अधिक्षक अभियंता, “गट-अ” (राजपत्रित) या पदावरून मुख्य विद्युत निरीक्षक, गट-अ (राजपत्रित) या पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्याबाबत...
(निवडसूची वर्ष सन २०२५-२६)

महाराष्ट्र शासन

ऊर्जा विभाग,

शासन आदेश क्रमांक मुविनि-२०२२/प्र.क्र.५५/ऊर्जा-१

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई.
दिनांक : ३१ ऑगस्ट, २०२६.

संदर्भ:- १. उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. मुविनि-२०१५/प्र.क्र.२२/ऊर्जा-५, दि.१०.०८.२०१८

२.उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग शासन निर्णय क्र. मुविनि-२०२३/प्र.क्र.०९/ऊर्जा-१, दि.२९.०६.२०२६.

३. मा. मुख्य सचिव यांच्या दि.०८.०७.२०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

४. ऊर्जा विभाग शासन आदेश क्र. मुविनि-२०२६/प्र.क्र. १३९/ऊर्जा-१, दि.२७.०८.२०२६

५. सामान्य प्रशासन विभाग आस्थापना मंडळ क्र.२ यांचे क्र. ईएसबी-११२६/प्र.क्र.१२८/ आस्थामं (का.१३), दि.२७.०८.२०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

शासन आदेश:-

ऊर्जा विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील विद्युत निरीक्षणालय शाखेअंतर्गत अधीक्षक अभियंता,“गट-अ” (राजपत्रित) या संवर्गातून मुख्य विद्युत निरीक्षक,“गट-अ” (राजपत्रित) या पदावर पदोन्नतीसाठीच्या सन २०२५-२६ च्या निवडसूचीमधील ज्येष्ठतेनुसार, खालील तक्त्यामध्ये **स्तंभ ३** येथे नमूद केलेले अधीक्षक अभियंता, गट-अ (राजपत्रित) **(निवडश्रेणी वेतनस्तर एस-२७: रु.१२३१००-२१५९००)** यांना मुख्य विद्युत निरीक्षक, गट-अ (राजपत्रित) **(वेतनश्रेणी एस-२९: रू.१३११००-२१६६००)** या पदावर सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने सदर आदेशान्वये विहित अटींच्या अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे. पदोन्नतीनंतर मुख्य विद्युत निरीक्षक, “गट-अ” (राजपत्रित) **(वेतनश्रेणी एस-२९: रू.१३११००-२१६६००)** म्हणून त्यांची पदस्थापना त्यांच्या नावासमोर **स्तंभ-६** मध्ये दर्शविण्यात आलेल्या पदावरील ठिकाणी करण्यात येत आहे.

अ. क्र.	ज्येष्ठता क्रमाक	अधिकाऱ्याचे नाव	अधिकाऱ्या चा स्वत: चा प्रवर्ग	सध्याची पदस्थापना	पदोन्नतीनंतरची पदस्थापना
१	२	३	४	५	६
१	२	श्री.दिनेश जगन्नाथ खोंडे. **(से.नि.दि. ३१.०८.२०२६)**	अ.जा.	अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळ, छत्रपती संभाजीनगर.	मुख्य विद्युत निरीक्षक, मुंबई.

०२. उपरोक्त नमूद अधीक्षक अभियंता यांची सदर पदोन्नती व पदस्थापना ही पुढे नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरूपात करण्यात येत आहे:-

(१) सदर पदोन्नती मा. सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुमती याचिका क्र. २८३०६/२०१७ मधील अंतिम निर्णयास अधीन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येत आहे. तसेच सदर पदोन्नती रिट पिटीशन स्टँप नं. १०८७६/२०२१ व रिट पिटीशन स्टँप नं. १०८७८/२०२१ मध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.२५.०५.२०२१ रोजी दिलेल्या निर्णयानुसार नमूद रिट याचिकेत होणाऱ्या निर्णयाच्या अधीन राहील.

(२) सदर पदोन्नती मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ यांचेसमोरील रिट याचिका क्र.१८०११/२०२५ व रिट याचिका क्र.१६८४२/२०२५ मधील अंतिम निर्णयास अधीन राहून करण्यात येत आहे.

(३) सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी निवडसूचीतील अधिकाऱ्यांना नियमितपणाचा व सेवाज्येष्ठतेचा कोणताही हक्क मिळणार नाही. तसेच सदर अधिकाऱ्याला देण्यात आलेली निव्वळ तात्पुरती पदोन्नती कोणतीही पूर्व सूचना वा नोटिस न देता रद्द करण्याचा अधिकार शासन राखून ठेवीत आहे.

(४) सदर अधिकाऱ्याला देण्यात येणारी निव्वळ तात्पुरती पदोन्नती ही त्यांच्याविरुध्द आदेशाच्या दिनांकापर्यंत कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी/ फौजदारी प्रकरण/ न्यायालयीन प्रकरण सुरु झालेली नाही वा प्रस्तावित नाही, या धारणेच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

(५) सदर अधिकाऱ्याने मुख्य विद्युत निरीक्षक, "गट-अ" (राजपत्रित) या पदावरील तात्पुरती पदोन्नती न स्विकारल्यास शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-२०१५/ प्र.क्र.३०३०/ कार्या-१२, दि.१२.०९.२०१६ मधील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

०३. श्री.दिनेश खोंडे यांनी पदोन्नतीने पदस्थापनेच्या ठिकाणी रूजू होण्यासाठी कोणत्या दिनांकास कार्यमुक्त झाले आणि ते पदस्थापनेच्या ठिकाणी कोणत्या दिनांकास हजर झाले याबाबत शासनास avinash.atkad@nic.in या ई-मेल पत्त्यावर त्वरित अवगत करावे.

०४. श्री.दिनेश खोंडे यांनी कमीत कमी पदग्रहण अवधी घेऊन नव्या पदाचा पदभार स्वीकारावा व आपला पदग्रहण अहवाल शासनास विनाविलंब सादर करावा. सदर अधिकारी पदोन्नतीने पदस्थापनेच्या पदावर या आदेशाच्या दिनांकापासून विहीत मुदतीत रुजू न झाल्यास त्याचा अनुपस्थितीचा कालावधी हा **अकार्यदिन (dies non)** म्हणून गणला जाईल. तसेच, त्यांचे लक्ष महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम-२३ कडे वेधण्यात येत आहे. सदर नियमातील तरतूदी लक्षात घेता, त्यांनी पदस्थापनेत बदल करण्यासाठी कुठल्याही स्वरुपाची आवेदने सादर केल्यास ते शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील.

०५. श्री.दिनेश खोंडे यांनी पदोन्नतीच्या पदावर पदग्रहण केल्यापासून एक महिन्याच्या आत वेतननिश्चितीचा विकल्प द्यावा. असा विकल्प विहित मुदतीत न दिल्यास त्यांची वेतननिश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम क्र. ११ (१) (ए) अनुसार पदोन्नतीचा दिनांक विचारात घेवून करण्यात यावी.

०६. सदर शासन आदेश सामान्य प्रशासन विभाग आस्थापना मंडळ क्र.०२ यांच्या संदर्भ क्र. ५ येथील दि.२७.०८.२०२६ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्ताअन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

०७. सदर आदेशान्वये, श्री. संदीप पाटील, मुख्य अभियंता (विद्युत) (तात्पुरते पद) यांच्याकडे संदर्भ क्र. ४ येथील दि.२७.०८.२०२६ रोजीच्या आदेशाद्वारे सोपविण्यात आलेला मुख्य विद्युत निरीक्षक या पदाचा अतिरिक्त कार्यभार संपुष्ठात आला आहे.

०८. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६०८३११५४९३२००५३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AVINASH RAJESH ATKAD

Digitally signed by AVINASH RAJESH ATKAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD, 2.5.4.20=F772EE0A28E62B88C18153A71C018DB8CA85BB88519F9C9732879CD03483D005, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7DFB83DE598E6DA39C6F3759E6943FB264003EB8BAFCBA24102A6D87367C3EA1, cn=AVINASH RAJESH ATKAD
Date: 2026.08.31 15:50:16 +05'30'

(अविनाश रा.आतकड)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (नगर विकास विभाग व इतर) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (राज्य उत्पादन शुल्क व इतर) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व मा. संसद सदस्य/ विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य.
६. सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद/ विधानसभा, विधानभवन, मुंबई.
८. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
९. महालेखापाल (लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र१/२, मुंबई/नागपूर.
१०. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. अपर मुख्य सचिव, ऊर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. सह सचिव (ऊर्जा-१), ऊर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. मुख्य विद्युत निरीक्षक, प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई.
१५. श्री.दिनेश खोंडे,अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत निरीक्षक मंडळ, छ. संभाजीनगर (विहीत मार्गाने)
१६. अधीदान व लेखा कोषागार अधिकारी, मुंबई.
१७. अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत निरीक्षक मंडळ, मुंबई/पुणे/नागपूर.
१८. निवडनस्ती (ऊर्जा-१).